पोलीस निरीक्षक, यवत पोलीस स्टेशन यांचे कार्यालय,
यवत ता.दौंड जि.पुणे
दुरध्वनी क्रमांक:-०२११७—२६२३१४
ई मेल— piyavat.pnr@mahapolice.gov.in

प्रेस नोट दि. २३/११/२०२६

''मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र यांच्याकडून यवत पोलीस स्टेशनची वार्षिक तपासणी''

आज दि. २३/११/२०२६ रोजी मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र यांनी यवत पोलीस स्टेशनला भेट देऊन पोलीस स्टेशनची वार्षिक तपासणी केली. सदर वार्षिक तपासणीदरम्यान त्यांनी यवत पोलीस स्टेशनच्या दप्तर, अभिलेख, गुन्हे दाखल व तपास कामकाज, कायदा व सुव्यवस्था तसेच गुन्हे प्रतिबंधक उपाययोजना यांचा सखोल आढावा घेतला. त्यानंतर यवत पोलीस स्टेशनचे अधिकारी व अंमलदार, पोलीस स्टेशन हद्दीतील पोलीस पाटील व महिला यांची विशेष बैठक आयोजित करून बैठकीत मा. विशेष पोलीस महानिरीक्षक यांनी उपस्थितांना सायबर गुन्हे, फसवणुकीचे गुन्हे, महिलांविषयक गुन्हे तसेच अमली पदार्थांचे दुष्परिणाम याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यावेळी मा. विशेष पोलीस महानिरीक्षक यांनी पोलीस पाटीलांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. गावपातळीवरील कायदा व सुव्यवस्था, माहिती संकलन तसेच गुन्हे प्रतिबंध यामध्ये पोलीस पाटलांची भूमिका महत्वाची असल्याचे सांगून त्यांच्या समस्या सोडविण्याबाबत आश्वासन दिले. पोलीस पाटीलांना गावातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी, गुन्हे प्रतिबंधासाठी तसेच सामाजिक शांतता व सुरक्षितता कायम ठेवण्यासाठी पोलीस प्रशासनास सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

यवत पोलीस स्टेशन हद्दीतील विविध गुन्ह्यांमध्ये चोरी गेलेले २१ ॲन्ड्राईड मोबाईल फोन व ३ तोळे सोनेचे दागिने असा एकूण ७,५०,०००/— रू. मुददेमाल मा.विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्या हस्ते तक्रारदारांना परत सुपूर्द करण्यात आलेला असून तक्रारदारांनी पोलीस प्रशासनाचे आभार मानले. सदर वार्षिक तपासणीदरम्यान यवत पोलीस स्टेशनच्या एकूण कामकाजाचा व कामगिरीचा आढावा घेतल्यानंतर मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र यांनी यवत पोलीस स्टेशनच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले. सदर वार्षिक तपासणीवेळी मा. संदीपसिंह गिल, पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण व मा. गणेश बिराजदार, अपर पोलीस अधिक्षक बारामती तसेच मा. बापुराव दडस, उपविभागीय पोलीस अधिकारी दौंड उपविभाग इ.उपस्थित होते. नागरिकांची सुरक्षितता, गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण आणि जनतेमध्ये कायद्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी यवत पोलीस स्टेशन कटिबद्ध आहे.